पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ३

सभावृत्तांत

दिनांक - २०/०८/२०१४ वेळ - दुपारी ४.१० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२०/०८/२०१४** रोजी दुपारी **४.१०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१)** मा. ननवरे जितेंद्र बाबा - **सभापती**
२) मा. तानाजी विठ्ठल खाडे
३) मा. मोटे किरण बाळासाहेब
४) मा. गिता सुशिल मंचरकर
५) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६) मा. बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे - क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या मान्यतेने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.४) क्रीडा दिनानिमित्त प्रदर्शनीय जलतरण स्पर्धा आयोजनाबाबत - मा.तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) सभा आयोजनाचे वेळेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक २१/०५/२०१४, ०४/०६/२०१४ व ०६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २१)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक **०६/०८/२०१४** रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमाक २)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - १
दिनांक - २०/०८/२०१४ विभाग - क्रीडा
सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.सुरेश म्हेत्रे
संदर्भ : मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२९६/२०१४, दि.०७/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.सुमित स्पोर्टस् अन्ड फिटनेस इक्विपमेंट चिंचवड पुणे १९ यांना नेहरुनगर, थेरगाव,भोसरी, चिंचवडगाव, मा.आयुक्त निवास, पिंपळे गुरव, यमुनानगर तलावाचे पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, देखभाल व यांत्रिक दुरुस्ती कामकाज व मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस चिंचवड पुणे १९ यांना निगडी प्राधिकरण, मोहननगर, सांगवी, कासारवाडी तलावाचे पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, देखभाल व यांत्रिक दुरुस्ती कामकाज दि.०१/१२/२०१३ ते ई-निविदा नोटीस क्र.१/२०१३-१४ ची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत यापूर्वी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार प्रस्तावात नमुद केलेल्या गतवर्षीच्या दराने मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - २
दिनांक - २०/०८/२०१४
सुचक - मा.गीता मंचरकर अनुमोदक - मा.सुरेश म्हेत्रे
संदर्भ : मा. सविता साळुंके, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.
विषय - मनपाचा सेक्टर २६ आकुर्डी येथील लॉन टेनिस कोर्ट क्र. १ व २ भाडेकराराने चालविण्यास देणेबाबत ....

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक - ३
दिनांक - २०/०८/२०१४ विभाग - क्रीडा
सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.सुरेश म्हेत्रे
संदर्भ : मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/९३/२०१४, दि.०६/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात नोंदणीकृत संस्था / मंडळे यांचेकडून प्राप्त झालेल्या अर्जांपैकी पात्र झालेल्या संस्थांना १) साई संस्कार संस्था, आकुर्डी पुणे र.रु.२,०२,०८२/- २) शारदा महिला बाल विकास शिक्षण प्रसारक मंडळ, पिंपळेगुरव, पुणे र.रु.८८,३३३/- ३) माई बाल भवन, आदर्शनगर, मामुर्डीगांव, पुणे र.रु.५३,४५३/- या प्रमाणे एकूण र.रु.३,४३,८६८/- अनुदान अदा केले असल्याने त्याचे

अवलोकन होऊन त्यास कार्योत्तर मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक - ४

दिनांक - २०/०८/२०१४

सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.किरण मोटे

संदर्भ : मा. तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगार पालिकेच्यावतीने व पिंपरी चिंचवड स्विमिंग असोसिएशन यांचे सहकार्याने दि.२९ ऑगस्ट २०१४ क्रीडा दिनानिमित्त ,दि. २८ ऑगस्ट २०१४ रोजी कै आण्णासाहेब मगर स्टेडियम जलतरण तलाव ,नेहरूनगर पिंपरी ४११०१८ येथे प्रदर्शनीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. सदर जलतरण स्पर्धा १४,१७,वर्षाखालील मुले व मुली तसेच १७ वर्षावरील महिला व पुरुष या ६ वयोगटात होणार असून या स्पर्धेत अंदाजे १०५ खेळाडूंचा समावेश होणार आहे. म.न.पा.च्या वतीने क्रीडा दिनानिमित्त प्रदर्शनीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करणेकामी खालील प्रमाणे खर्च येणार आहे.

| **अ.क्र.** | **खर्च तपशिल** | **अंदाजे खर्च र.रु.** |
|---|---|---|
| १ | १४,वर्षाखालील मुले व मुली=१२ ट्रॉफिज<br>१७,वर्षाखालील मुले व मुली=१२ ट्रॉफिज<br>१७ वर्षावरील महिला व पुरुष=१२ ट्रॉफिज =एकूण ३६ ट्रॉफिज | ३६,०००/- |
| २ | विजेत्या खेळाडूंना द्यावयाची मेरीट प्रमाण पत्रे =५० नग<br>सहभागी खेळाडूंना द्यावयाची प्रमाण पत्रे =१०० नग | ३,७५०/- |
| ३ | पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर खर्च | ७५०/- |
| ४ | हार बुके नारळ खर्च | ४,०००/- |
| ५ | निमंत्रण पत्रिका छपाई=५०० नग | ५,०००/- |
| | **एकूण र.रु.** | **४९,५००/-** |

वरीलप्रमाणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व पिंपरी चिंचवड स्विमिंग असोसिएशन यांचे सहकार्याने दि.२९ ऑगस्ट २०१४ क्रीडा दिनानिमित्त ,दि. २८ ऑगस्ट २०१४ रोजी कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम जलतरण तलाव ,नेहरूनगर पिंपरी ४११०१८ येथे प्रदर्शनीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करणेस व

त्याकामी येणा-या र.रु.४९,५००/-चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - ५

दिनांक - २०/०८/२०१४

सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.किरण मोटे

संदर्भ : मा. तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा समितीची पाक्षिक सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या बुधवारी दुपारी ४.१० ऐवजी दुपारी २.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी / सुट्टया असलेस त्या सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दुपारी २.०० वा. भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्यास होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( ननवरे जितेंद्र बाबा )**
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७०२/२०१४
दिनांक : २०/०८/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.